# प्रसार माध्यमात साहित्य आणि संगीत

प्रा. डॉ. अस्मिता नानोटी,
संगीत विभाग प्रमुख,
अशोक मोहोरकर आर्टस आणि कॉमर्स कॉलेज अडयाळ, ता. पवनी, जि. भंडारा
मो.नं. ९३७१८४६४७३

---

**प्रस्तावना :-**

आधुनिक युगात प्रसारमाध्यमे हे जनसंवादाचे आणि अभिव्यक्ती प्रकटनाचे सुलभ व प्रभावी साधन बनले आहे. साहित्य आणि संगीत क्षेत्रात या प्रसार माध्यमांचे लक्षणीय योगदान आहे. 'हे विश्वची माझ घर' ही संकल्पना आजतागायत मानवाला तितकीशी स्वीकारणे शक्य झालेले नाही मात्र मानवनिर्मित प्रसार माध्यमांनी ते निर्विवाद सिध्द केल आहे! वर्तमानपत्रे, मासिके, रेडिओ, टीव्ही, चित्रपट ही सगळी प्रसार माध्यमे आपल्या आयुष्यात महत्वाची होऊन बसलेली आहेत. पण या सगळयांवर कळस ठरलेले माध्यम म्हणजे इलेक्ट्रॉनिक सोशल मिडिया! मोबाईलवरील व्हाट्सअॅप, ट्वीटर, फेसबुक, युटयुब आणि इंस्ट्राग्राम या सगळयांनी तर आपल्या मनावर गारूड केले आहे.

साहित्य आणि संगीताच्या श्रेष्ठाश्रेष्ठतेचा विषयच असू नये त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत कारण ते अन्योन्याश्रित आहेत. साहित्य म्हणते मला अर्थ आहे पण मला खरे बोलके केले ते संगीतानेच! साहित्याने संगीताला बहर आणला तर संगीताने साहित्याला फुलवले! सरस्वतीने डाव्या हातात ज्ञानपुस्तिका आणि उजव्या हाती वीणा धारण करणे, हे साहित्य आणि संगीताच्या एकरूपत्वाच□ प्रतीकच म्हणावे लागेल!

**साहित्य आणि संगीताचा संबंध:-**

मानव हा चेतनामय प्राणी आहे आणि ही चेतनाच अनुभूतीचे उगमस्थान आहे. या अनुभूतीचे प्रमाण जेव्हा प्रमाणापेक्षा जास्त होते तेव्हा निर्माण झालेल्या व्याकुळतेच्या परमोच्च क्षणीच अभिव्यक्ती प्रकट होते. महान कवी विल्यम वर्डस्वर्थ म्हणतात – Poetry is the spontaneous overflow of powerful feelings : is takes its origin from emotion recollected in tranquility. मात्र भारतीय तत्वज्ञानानुसार या अभिव्यक्तीच प्रकटीकरण हे कधी स्वर आणि लयीच्या स्वरूपात संगीतात प्रकट होते तर कधी शब्द आणि वाणीच्या रूपात साहित्यात!

साहित्य आणि संगीताचा उगम काय? हा प्रश्न विचारतांना पुढील प्रश्न समोर येतात. १. साहित्य आणि संगीताचा उगम हां कोतो? कोणत्या प्रक्रियेतून साहित्य आणि संगीत अस्तित्वात येते? जरी हे दोन्ही सवाल वेगळे असले तरी ते एकमेकांशी निगडीत आहेत. अमेरिकन संगीत शास्त्रज्ञ कूर्ट साक्स (१८४८-१९३६) याने असा विचार मांडला की भाषण व भावना या दोहोंत संगीताचा उगम आहे. तर फेड्रिख व्हिल्हेल्म हा जर्मन तत्वज्ञ तर विल्यम्स वर्डस्वर्थ प्रमाणे संगीताचा जन्म पूर्णतया स्फूर्तीतून व साक्षात्कारवादी असतो असा विचार मांडतो. हे दोन्हीही सिध्दान्त संगीताबरोबर साहित्यासाठी सुध्दा चपखल लागू पडतात.

'सं+गीत' म्हणजे पूर्णत्वास गेलेले गीत अशी संगीताची व्युत्पत्ती सांगितली जात□. गीतास वाद्याची जोड असल्याशिवाय गीत सिध्द होत नाही. बौध्द व जैन धर्मात संगीताला 'गंधव्ववेद' अशी समानार्थी संज्ञा असून त्यातही गीत,

वाद्य, आख्यान व नाटक या सर्वांचा मेळ घातला आहे. सामान्यत: संगीतात शब्दांचे स्थान दाखविणारी भरपुर सामुग्री आपल्या प्राचीन संस्कृत वाङ्मयात सापडते. प्राणिमात्राला आपल्या भावभावना अभिव्यक्त करण्यासाठी नादाचा दोन प्रकारे उपयोग करावा लगातो. १. वर्णरूप २. स्वररूप. वर्णरूप नाद हा साहित्यशास्त्राचा तर नाद हा संगीतशास्त्राचा विषय होतो. संगीतातील स्वररूप शब्द आणि साहित्यातील वर्णरूप शब्द हे जुळया भावंडाप्रमाणे सहोदर आहेत. संगीत, स्वरांव्दारे तर साहित्य वर्णनिर्मित शब्दांव्दारे भावनाभिव्यक्ती करते. दोन्हीचा इच्छित व अपेक्षित परिणामही एकच आहे व तो म्हणजे जनरंजन व स्वानंद! मनुष्याला देहभान विसरावयास लावण्याची शक्ती या दोन्ही कलांमध्ये आहे. गुरूदेव रविन्द्रनाथ टागोर म्हणतात, “जेथे शब्द संपतात तेथुन संगीत सुरू होते.”

साहित्य आणि संगीत ही भाव – अभिव्यक्तीची दोन प्रमुख साधने आहेत. शब्द आणि स्वर यातून मनाच्या वेगवेगळया अवस्था प्रकट होता. मानवी मनामनात प्रकट होणा-या कुठल्याही भाव-भावना निर्गुण निराकार असतात त्यांना आक□र देऊन दुस-यापर्यंत पोहचविण्याचे कार्य साहित्य आणि संगीत करते. शब्दांचा उपयोग संगीतात आणि संगीताचा उपयोग साहित्यात अगदी वैदिक काळापासून होत आहे. काव्य म्हटले की ते ग□य असते हे सर्वश्रुतच आहे. भारतीय संस्कृतीचे सर्व धर्मग्रंथ काव्य आहेत. स्कंदपुराण विष्णु गातात तर महर्षी वाल्मिकिंनी शब्दबध्द केलेले रामायण लव-कुश गाताता! अर्थात साहित्य आणि संगीताचे जीवाभावाचे नाते अनादिकालापासून आहे. शब्दातील भावनांना, शब्दातील गतीला सर्वसाधारण रूप देण्याचे कार्य संगीत करते. थोडक्यात कंठ संगीत व वाद्यसंगीत व शब्दरचना या तीन्हींचे एकत्र येऊन सादर होणे म्हणजे संगीत !

**<u>साहित्य संगीताची मुलतत्वे :-</u>**

संगीताची तीन मुलतत्वे आहेत – १. तारता-स्वरग्राम २. लय-ताल आणि ३. भाषिक ध्वनि – सार्थ व निरर्थ छंद. संगीताचे तिसरे मूलतत्व साहित्यिक अंगाने सिध्द होते. सार्थ शब्द वापरून केलेल्या भाषिक रचना संगीतात वापरल्या जातात. तसेच निरर्थ भाषिक ध्वनीही, तालाचे बोल व्यक्त करण्याकरीता वापरले जातात. याशिवाय साहित्य व संगीतात महत्वाची भुमिका बजावणारे भाषिक अंग म्हणजे वृत्त व छंद होय. ज्या काही पदरचना निर्माण होतात त्या कोणत्या ना कोणत्या भाव किंवा रसोत्पत्तीकडे निर्देश करतात कारण साहित्यिक आपल्या विभिन्न भावभावनांना व मानसिक अवस्थांना शब्दात चित्रित करत असतात. तर दुसरीकडे गायक व संगीतकार सुध्दा रागांना विविध भाव आणि रसांशी जोडून बघतात. सामान्यत: संगीता सोबत साहित्याच्या नात्याचा विचार होतो तेव्हा संगीताचा अर्थ केवळ कंठ संगीत किंवा गायन अशा दृष्टिकोनातून केला जातो. अप्रत्यक्षपणे हे खरे असले तरी तबला, पखावज सारख्या अवनध्द वाद्यांमधेही साहित्याचा वापर प्राचीन काळापासून होतो आहे. काही जुने वादक कलाकार आजही सांगितिक रचनांच्या लयीच्या संदर्भात छंद शब्दाचा प्रयोग करतांना दिसतात. खर पाहता छंद रूपी अलंकारानेच भाषेला अलंकृत करता येते. म्हणून तर वेद, पुराण, महाकाव्य आणि आधुनिक युगातील काव्यात छंदाला महत्व आहे. विव्दानांची मान्यता आहे की संगीत नादमय आहे आणि नाद छंदमय आहे अर्थात संगीत आणि छंद आपआपसात अन्योन्याश्रित आहेत. ध्वनिची स्वरबध्द आणि शब्दबध्द रचना निश्चित कालमापनानुसारच होते त्यामुळ□ दोहोंमधेही छंद आहेच ! विशेष म्हणजे हे छंद गति, यति, मात्रा, गण आणि लय याव्दारेच निश्चित होतात. पदमभूषण पं. श्रीकृष्ण नारायण रातंजनकरांनुसार प्राचीन छंदशास्त्र हे गणवृत्त आणि मात्रावृत्त या दोन्ही प्रकारच्या वृत्तांव्दारे समजवले गेले आहे. साहित्यातील मात्रावृत्तातूनच संगीतातील तालांची निर्मिती झाली आहे. थोडक्यात काव्यात जो छंद आहे तोच संगीतात ताल आहे. उस्ताद अमीर हुसैन खॉ साहेब म्हणत की, तबल्याची एक भाषा आहे ज्यात काव्य निर्माण होते. स्व. सुधीर कुमार सक्सेना, उस्ताद हबीबुद्दीन खां यांच्या कायदा विस्तारात लपलेली शेरो-शायरी आणि काफिया, रदीफ साहित्याचा अनुभव देते. काव्यरचनेत किंवा तालात कोणत्या एका

वर्णाचा वारंवार प्रयोग होतो तेव्हा त्याला लटानुप्रास असे म्हणतात. तालवाद्यातील गत आणि गायनातील ताना हा

लटानुप्रासच आहे दुसरे काय?

**साहित्य संगीताचा अंतर्भाव :-**

भावन□ व्यक्त करण्यासाठी विविध रसांच्या उत्पत्तीसाठी संगीत आवश्यक आहे. हयाचा अर्थ असा नाही की साहित्याशिवाय केवळ संगीताच्या माध्यमातूनच भाव व्यक्त होऊ शकतात. संगीतातील ही भावाभिव्यक्ती साहित्याशिवाय संभव नाही कारण दोहोंचेही उदगमस्थान एकच आहे! दोन्ही कला एक दुस-याशिवाय अपूर्ण आहेत. साधारण अशा भावनाभिव्यकतीसाठी आम्हाला दोन्ही कलांची मदत घ्यावीच लागते. अन्यथा कलाकार आपली भावना परिपूर्णतेने व्यक्त करू शकत नाही. साहित्य आणि संगीताच्या संयोगाने भावनाभिव्यक्ती अत्यंत सरळ, सफल आणि सर्वग्राहय होते. दोन्ही कलांना जनमाणसांपर्यंत पोहचविण्यासाठी आपल्याला दोन्ही कलांचे समन्वित रूप जास्त फायदेशिर ठरते. या दोन्ही कलांचा समन्वय न झाल्यास दोन्ही कला जनता जनार्दनापासून दूर राहण्याचे प्रमुख कारण होऊ शकेल. संगीतात सुंदर साहित्याचा समावेश न झाल्यास ते संगीत श्रोत्यांच्या निकट पोहचणे अवघड आहे. कोणतीही कला पूर्णत्वाने जनतेपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला गेला नाही तर तिचा विकास होणे अवघड आहे आणि अंतिमत: ती नष्ट सुध्दा होऊ शकेल. आपण बघतो की प्रत्येक भाषेत नित्यनूतन काव्यरचना निर्माण होत असतात परंतु ती वर्तमानपत्रे व मासिकांमध्येच बंदिस्त होऊन राहतात. वेदद्रस्टे ऋषी, मुनी, व्यास, वाल्मिकी, सुरदास, तुलसीदास, मीरा, कबीर, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास यासारख्या महामानवांच्या काव्यांना आजही शेकडो वर्षांनी जे स्थान प्राप्त आहे ते स्थान आजकालच्या काव्यरचनांना प्राप्त होऊ शकत नाही. या महानुभावांची पदे आजही सर्व शिक्षित अशिक्षित लोक कंठस्थ करतांना दिसतात. हयाचे मुख्य रहस्य आहे त्या प्राचीन कवींच्या रचनांमध्ये संगीताचा समावेश असणे. तुलसीदासांची चौपाई, अज्ञानेश्वरांचा हरिपाठ आणि समर्थाचे मनाचे श्लोक गातांना लोक केवळ या काव्यांच्या गानलयीत मंत्रमुग्ध होत नाहीत. तर कवीच्या सर्व भावनांप्रती श्रध्दा आणि पवित्र भावाने तादात्म्य पावतात.

संगीतात ज्याप्रमाणे उच्च कोटीच्या साहित्याचा अंतर्भाव असणे नितांत आवश्यक आहे. तसेच कवींना पण संगीताचे ज्ञान असणे अनिवार्य आहे. केवळ तेव्हा आणि तेव्हाच आम्ही एका अमूर्त कलेला जन्म देऊ शकतो. रामायण, महाभारतामध्ये सुंदर साहित्य-संगीत नसते तर हे महाकाव्य, कधीच लोप पावले असते. असे लक्षात येते की, आजकाल थोडया थोडक्या व तोकडया साहित्य अध्ययनानंतर बरेच लोक काव्य लिखाणास प्रारंभ करतात पण त्यांच्या हे लक्षात येत नाही की त्यांना संगीताचे प्रारंभिक ज्ञान सुध्दा नाही त्यामुळे ते आपल्या साहित्यात सुंदर संगीताचा अंतर्भाव कसा करू शकतील? परिणामस्वरूप त्या रचनांचा अंतिम कळस केवळ आत्मप्रौढी व पुस्तक प्रकाशन सोहळे होऊन बसतात. जर त्या छंदबध्द व अलंकारांनी नटलेल्या रचनांना सुरेख चाली व संगीतात बांधले गेले तर अशा रचना त्यांना त्यांच्या जीवनभर स्मरणात तर राहतीलच पण श्रोते आणि वाचकांसाठी सुध्दा तो एक अजरामर अमुल्या ठेवा निर्माण करून जातील. आंतरिक भावभावनांना जेव्हा मार्मिक शब्द गवसतील तसेच भावांच्या प्रकृतीनुसार स्वर समुदाय आणि लयीचा त्यात समन्वय होईल तेव्हाच श्रोते आणि वाचकांच्या हृदयात आणि बुध्दीत त्याचा चिरकाल प्रभाव पडेल, जे ऐकून श्रोत्यांच्या मुखामुखातुन वा ! असा शब्द आपुसकच बाहेर पडल्याशिवाय राहणार नाही.

**साहित्यज्ञ आणि संगीतज्ञ यांचा सुरेख मिलाफ :-**

१२ व्या शतकात जयदेव हे प्रतिभावान कवी आणि संगीतज्ञ आपल्या 'गीत-गोविंद' या साहित्य आणि संगीतमय काव्याने अजरामर झाले. संत ज्ञानेश्वर, कबीर, तुकाराम, रामदास या व इतर सर्व संतांनी आपल्या काव्यातून, अभंगातून आध्यात्मिक उन्नतीचे मुळ संगीत आणि संत वाडमय आहे हे सिध्द केले आहे. समस्त संत कवी हे कवी आणि संगीत रचानाकारही होते. आपण जेव्हा एखादे भजन ऐकतो तेव्हा त्यातील शब्द हे सुरांना घेऊन त्याची भक्तिरसात्मक भूमिका

श्रोत्यांना विषद करतात. त्यातून जर साथसंगत आणि आलापी समर्थ असली तर मनात भक्तिरसाचे झरे उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहीत. उदा. पं. भीमस□न जोशी, स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर, भजनगायक अनुप जलोटा आणि हरि ओम शरण त्यांच्या भजन गायकीत ते शब्द आणि सुरांचा सुरेख मिलाफ साधतात. थोडक्यात साहित्य आणि संगीताचा मेळ जमला की शब्द जीवंत होतात. जेव्हा या दोन्ही भाषा हातात हात घालून मानवासमोर प्रकट होतात तेव्हाच मानव मंत्रमुग्ध होऊन ती कलाकृती श्रवण करतो, अस्वाद घेतो व अवर्णनीस आनंद हिंदोळयावर हिंदोळे घेऊ लागतो. 'रूणझुण रूणझुण रे भ्रमरा', 'मोगरा फुलला ..', 'गीतरामायण', 'जयोस्तुते जयोस्तुते श्री महन्मंगले', 'ने मजसी ने परत मातृभुमीला', 'घेई छंद मकरंद..' 'उष:काल होता होता ..' 'ए मेरे वतन के लोगो ..' 'दिल अपना और प्रित पराई ..' ही आणि अशी बरीच संगीतमय गीत आपल्या मनावर आजपावेतो अधिराज्य गाजवीत आहेत आणि म्हणूनच नाटयगीत, सुगमसंगीत, संतसंगीत, चित्रपट संगीतातले गीतकार आणि संगीतकार अजरामर होतांना दिसतात. म्हणूनच केवळ संगीताचे किंवा केवळ साहित्याचे ज्ञान असलेल्या कलावंतांनी एकदुस-यांसोबत समन्वय साधून एका नवीन रचनांना जन्म दिल्यास अजरामर कलाकृती सिध्द होईल. असे प्रयोग आजतागायत झाले आहेत व होत राहावेत. संगीतज्ञ आणि साहित्यज्ञ या दोघांच्याही समन्वयाने ज्या रचनेचा जन्म होईल ती रचना विशाल जनमानसाच्या हृदयाचा आणि मनमस्तिष्काचा ठाव घेतल्यावाचून राहणार नाही हे निर्विवाद सत्य आहे ! साहित्य ज्ञान देते आणि संगीत आनंद देते दोन्ही प्रकारामध्ये शांती आणि आनंद वास करतो.

**<u>प्रसारमाध्यमे :-</u>**

कलेची आवश्यकता, उपयोगिता आणि संमोहनशक्ती याविषयी कोणतीही व्यक्ती साशंक नसते. काव्य, गायन, वादन व नृत्य आवडत नाही अशी व्यक्ती अपवादानेच सापडेल. मानवाचे साहित्य आणि संगीताप्रती स्वाभाविक प्रेम प्रमाणित करते की हे एक नैसर्गिक तत्व आणि प्रक्रिया आहे. आपल्या रोजच्या जीवनात सूचना, शिक्षा, संस्कृती, साहित्य आणि संगीताप्रती जागरूकत□ निर्माण होण्यासाठी प्रसार माध्यमे सहाय्यभूत ठरतात. जगातील ग्लोबल व्हिलेज या कल्पनेमध्ये या प्रसार माध्यमाचा महत्वपूर्ण सहभाग आहे. तसेच इतर क्षेत्रांप्रमाणे साहित्य आणि संगीत कला सुध्दा विविध प्रसार माध्यमांच्या विस्तारात अत्यंत महत्वाची भुमिका बजावते. आजच्या डिजीटल युगात वृत्तपत्रे आणि मासिके, हस्तपत्रके ही पूर्वापार चालत आलेली छापीव प्रसार माध्यमे जनमानसात स्वत:ची अनिवार्यता टिकवून आहेत. भारतीय मनोरंजन उद्योग साहित्य आणि संगीताशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. चित्रपट, दुरदर्शन, रेडिओ, ध्वनिफिती, ध्वनिमुद्रण ही सर्व दृक्श्राव्य माध्यमे साहित्य आणि संगीताच्या विविध प्रकारावर अवलंबून आहेत आणि सफलतापुर्वक प्रसिध्दी मिळवत आहेत व अर्थप्राप्ती करत आहेत. विविध कथानकांवरील मालिका, प्रवचन, धार्मिक मालिका, शास्त्रीय संगीत, वेस्टर्न जाझ, पॉप, रॉक, हिंदुस्तानी संगीत वगैरेचा यात समावेश होतो. तंत्रज्ञानाने मनोरंजन क्षेत्रात व उद्योगात भरपूर बदल घडवले आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे इंटरनेट ! यातून या प्रसार माध्यमांना एक नवी दिशा मिळाली आहे. विसाव्या शतकातील इलेक्ट्रॉनिक क्रांतीमुळे उपलब्ध झालेल्या तांत्रिक साधन-सुविधांचाही उदा. रेडिओ, कॅसेट्स, टेपरेकॉर्डर, रेकॉर्डस, रेकॉर्डप्लेअर, दूरदर्शन, व्ही.सी.आर, सीडी, सीडीप्लेअर, करावके, सिंगअलॉग, यु टयुब, ऑनलाईन गायन वादन व नृत्य सादरीकरण व शैक्षणिक मार्गदर्शन वर्ग, बातम्या, मालिका, व्याख्याने, चर्चासत्र यामुळे संगीत व साहित्याच्या प्रचार व प्रसाराच्या आणि पर्यायायाने कला शिक्षणाच्या प्रक्रियेत मोठाच हातभार लावला आहे.

दुरचित्रवाणीवर दरवर्षी अनेक नवीन वाहिन्या तसेच साहित्य आणि संगीताचे नवनवीन कार्यक्रम दाखल होत असतात. मात्र या क्षेत्रातही अनेक अडचणी आहेत. विविध माध्यमातील अनेक वाहिन्या केवळ पैसा कमविण्यासाठी युवकांना भ्रमित करत आहेत. हे युवक नैसर्गिक आवाजात सिनेमांमधील गीते व सुगम संगीत गातात परंतु संगीताचे आधारभूत ज्ञान नसल्यामुळे काही काळातच ते लुप्त होतात. अशा प्रकारच्या कामांमधून काही लोकांना व्यावसायिक

दृष्टया भरपूर फायदा होतो परंतु अनेक लोकांचे भविष्य यामुळे अंधकारमय होत आहे. या बाबतीत ज्या कलाकारांना

साहित्य आणि संगीताचे आधारभूत व योग्य ज्ञान आहे अश्यांनाच कार्यक्रमात सहभागी करून घ्यावे आणि त्यासाठी वाहिन्यांनी संबंधित क्षेत्रातील वरिष्ठ, अनुभवी आणि तज्ञ विद्वानांचे सहकार्य घ्यावे. अशाप्रकारे या लोकप्रिय प्रसार माध्यमांच्या मदतीने साहित्य आणि संगीत यांच्या योग्य समन्वयाने प्रसारमाध्यमांना व्यावसायिक व सामाजिक दृष्टीने अधिक उपयोगी बनवले जाऊ शकते.

जेव्हा प्रसार माध्यमांनी पोहोचवलेले साहित्य आणि संगीत लोकांना मानसिक शांती, समाधान, आनंद, आरोग्य आणि सकारात्मक विचार प्रदान करतील तेव्हा हे त्रिकुट मानवी जीवनात आणि परस्परांमध्येही एका महत्वपूर्ण भूमिकेचे निर्वहन करण्यास समर्थ ठरतील !

**<u>निष्कर्ष :-</u>**

१. साहित्य आणि संगीत अन्योन्याश्रित आहे.

२. साहित्य आणि संगीत हे मनोरंजनासोबत मन:शांती व सकारात्मक विचार देण्याचे स्त्रोत आहे.

३. संगीतज्ञ आणि साहित्यज्ञ या दोहोच्याही समन्वयातून निर्माण झालेली रचना मनाचा ठाव घेते.

४. प्रसारमाध्यमे, साहित्य आणि संगीताच्या प्रचार व प्रसारासोबत त्यांना ऐश्वर्य संपन्न बनवितात.

५. दुरदर्शन वाहिन्यांनी कार्यक्रम निर्मितीसाठी साहित्य आणि संगीत क्षेत्रातील विद्वानांचे सहकार्य घ्यावे.

**<u>संदर्भ :-</u>**

१. संगीताचे सौंदर्यशास्त्र – अशोक दामोदर रानडे, मुंबई – १९७१

२. संगीताचे मानसशास्त्र – श्यामला वनारसे, पुणे – १९७३

३. संतसाहित्य – सौंदर्य आणि सामर्थ्य ‘ डॉ. निर्मलकुमार फडकुले

४. संगीत निबंधावली – किरण फाटक

५. संगीत कला विहार